# निशाणी क्र. १३८ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ६ यांचे वारस दाखल करणेस झालेला विलंब माफ करून वारस दाखल करणेसाठी केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तूत कामी प्रतिवादी क्र.६ महादेव वासुदेव परब हे दि. १०/१२/२०१७ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. ६ हे मुंबई येथे राहत होते. मार्च २०२० ते ऑगस्ट २०२१ पर्यंत कोरोना विषाणु संसर्गामुळे राज्यात शासनाने लॉकडाऊन घोषित केला होता. वादी हे मीरारोड येथे राहत असून ते डायलेसिसच्या आजाराने सुमारे ३ वर्षाहून अधिक काळ आजारी होते. तसेच, त्यांचे सुमारे ६ महिन्यापुर्वी डाव्या डोळयाचे पडद्याचे ऑपरेशन झाले आहे. तदपूर्वी ३ महिने अगोदर त्यांचे उजव्या डोळयाचे पडद्याचे ऑपरेशन झाले आहे. त्यांना आठवडयातून ३ वेळा डायलेसिससाठी जावे लागते. या सर्व प्रकारामुळे वादी यांना मयत प्रतिवादी क्र. ६ चे वारस मुदतीत दाखल करणे शक्य झालेले नाही. सदर प्रतिवादीचे वारस दाखल करणेस वादीस ३ वर्षे ७ महिने ९ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदर प्रतिवादीचे वारस दाखल करणेस वादीने जाणूनबुजून विलंब केलेला नाही. तरी सदरचा विलंब माफ होऊन प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ चे वारस रेकॉर्डवर दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्ज खोटा व खोडसाळ आहे. सबब अर्ज फेटाळण्यात यावा. सदर अर्ज मंजूर करणेचा झालेस वादी यास जास्तीत जास्त रक्कम भरणेचा आदेश करणेत यावा

अशी विनंती प्रस्तूत प्रतिवादी यांनी केली आहे.

३. वादी व प्रतिवादी यांच्यातर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रतिवादी क्र. ६ हे दिनांक १०/१२/२०१७ इ. रोजी मयत झाले आहेत, असे दिसून येते. प्रस्तूत प्रतिवादी हे मयत झाले आहेत, याबाबत वाद दिसून येत नाही. सदरचा दावा वाटप, पृथक कब्जा व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. सदर दाव्यास प्रस्तूत प्रतिवादी क्र. ६ चे वारस हे आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे सदर विलंब माफ करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे:

**– आदेश –**

१. प्रस्तूतचा अर्ज रक्कम रु. ३०० च्या खर्चासह मंजूर करण्यात येतो. सदरचा खर्च वादींनी प्रतिवादी क्र. ६ च्या वारसांना देणेचा आहे.

सही/–
( बी.आर.पाटील )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

स्थळ : देवगड
दिनांक: २७/१०/२०२१